Vivekanand Education Society's
Institute of Technology
Approved Fees for AY 2025-26
By Fees Regulating Authority, Maharashtra State.
In their meeting held on dated 16.05.2025

| Particulars of Approved Fees | Bachelor of Engineering (B. Tech.) Amount in Rs. | Master of Engineering (M. Tech.) Amount in Rs. | Master of Computer Application (MCA) Amount in Rs. |
|---|---|---|---|
| Tuition Fees | 1,31,304/- | 52,174/- | 99,130/- |
| Development Fees | 19,696/- | 7,826/- | 14,870/- |
| Total | 1,51,000/- | 60,000/- | 1,14,000/- |

विवेकानंद एज्युकेशन सोसायटीचे
तंत्रज्ञान संस्था
शुल्क नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांच्याकडून
२०२५-२६ साठी मंजूर शुल्क.
१६.०५.२०२५ रोजी झालेल्या त्यांच्या बैठकीत

| मंजूर शुल्काचे तपशील | अभियांत्रिकी पदवी (बी. टेक) रक्कम रु. | मास्टर ऑफ इंजिनिअरिंग (एम.टेक.) रक्कम रु. | मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन (एमसीए) रक्कम रु. |
|---|---|---|---|
| शिक्षण शुल्क | १,३१,३०४/- | ५२,१७४/- | ९९,१३०/- |
| विकास शुल्क | १९,६९६/- | ७,८२६/- | १४,८७०/- |
| एकूण | १,५१,०००/- | ६०,०००/- | १,१४,०००/- |

وويڪانند ايجوڪيشن سوسائٽي جو
انسٽيٽيوٽ آف ٽيڪنالاجي
۲۰۲۵-۲٦ جي منظور ٿيل فيس
فيس ريگيوليٽنگ اٿارٽي، مهاراشٽر رياست پاران.
تاريخ ١٦.٠٥.٢٠٢٥ تي منعقد ٿيل انهن جي اجلاس ۾

| جا فيس ٿيل منظور تفصيل | بيچلر جي انجنيئرنگ رقم جي (اي بي) روپين ۾. | ماسٽر آف انجنيئرنگ روپين رقم جي (اي ايم) ۾. | ماسٽر آف ڪمپيوٽر ايپليڪيشن (اي سي ايم) روپين رقم جي ۾. |
|---|---|---|---|
| فيس ٽيوشن | ١٣١٣٠٤ | ٥٢١٧٤ | ٩٩١٣٠ |
| فيس ترقياتي | ١٩٦٩٦ | ٧٨٢٦ | ١٤٨٧٠ |
| ڪل | ١٥١٠٠٠ | ٦٠٠٠٠ | ١١٤٠٠٠ |

# शुल्क नियामक प्राधिकरण

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था
(प्रवेश व शुल्क यांचे विनियमन), अधिनियम, २०१५

"शिक्षण-नव्हे व्यवसाय-ज्ञान यज्ञ"

३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत,
४९, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१

ई-मेलः fra.govmh@gmail.com
संकेतस्थळः www.mahafra.org
दूरध्वनीः ०२२-३१९८०३४८ / मोबाईल क्र.८८२८७८६२६४


## शुल्क नियामक प्राधिकरणाच्या बैठकीचे इतिवृत्त
**दिनांक : १६ मे, २०२५**

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश आणि शुल्क विनियमन) अधिनियम, २०१५ च्या कलम ११ (२)(३)(४) अंतर्गत स्थापन केलेल्या शुल्क नियामक प्राधिकरणाची बैठक **दि.१६ मे, २०२५** रोजी बैठक रुम क्र.३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९ खेरवाडी, अली यावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ येथे संपन्न झाली.

**खालील सदस्य उपस्थित/अनुपस्थित होते :**

| | | |
|---|---|---|
| १ | मा. न्यायाधीश विजय एल.आचलिया (निवृत्त)<br>अध्यक्ष, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |
| २ | डॉ.विजय वसंत खोले<br>मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरु,<br>सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | अनुपस्थित |
| ३ | श्री.मनोज दामोदर चांडक<br>सनदी लेखापाल<br>सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | विडिओ कॉन्फरन्सिंगव्दारे उपस्थित |
| ४ | श्री.नितीन बापुराव चव्हाण<br>सनदी लेखापाल<br>सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |
| ५ | श्री.रत्नाकर (शिरीष) फडतरे<br>परिव्यय लेखापाल,<br>सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |
| ६ | श्री.अतुल दामोदर धारप<br>परिव्यय लेखापाल,<br>सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |
| ७ | श्री.ॲड.धमेंद्र दिलीप मिश्रा<br>व्यावसायिक शिक्षणतज्ञ,<br>सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |
| ८ | संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई<br>पद्सिध्द सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | अनुपस्थित |
| ९ | संचालक, उच्च शिक्षण (म.रा.)<br>पद्सिध्द सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | अनुपस्थित |
| १० | आयुक्त वैद्यकीय शिक्षण (म.रा.)<br>पद्सिध्द सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | अनुपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ११ | संचालक, आयुष (म.रा.)<br>पद्सिध्द सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | अनुपस्थित |
| १२ | महाराष्ट्र कृषी शिक्षण आणि संशोधन परिषदेचे सदस्य सचिव, पुणे आणि पद्सिध्द सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | अनुपस्थित |
| १३ | श्री दिलीप सरदेसाई,भा.प्र.से.<br>आयुक्त आणि सक्षम अधिकारी,राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष अतिरिक्त कार्यभार म्हणून सदस्य सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |

**विषय क्र.१ : दिनांक १५ मे २०२५ रोजी झालेल्या शुल्क नियामक प्राधिकरणाच्या बैठकीचे इतिवृत्त मंजूर करणेबाबत.**

"चर्चा झाली.

दि.१५ मे २०२५ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त कायम करण्यात आले आणि मंजूर झाले".

**विषय क्र.२: शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ साठी शुल्क मंजुरीच्या प्रस्तावांवर विचार करणे.**

"चर्चा केली.

प्रस्तावांच्या समर्थनार्थ सादर केलेल्या प्रस्तावांची आणि कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर खाली नमूद केलेल्या संस्था/महाविद्यालयांचे शुल्क खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आले आहे.

| Sr. No. | Institute Code | Institute Name | Course | Fees approved for the A.Y. 2025-2026 per student as per u/s. 2(g) of the Maharashtra Unaided Private Educational Institutions (Regulation of Admissions and Fees) Act, 2025 |
|---|---|---|---|---|
| 106 | EN3146 | Jawahar Education Society's Annasaheb Chudaman Patil College of Engineering | ENGG | 121000/- |
| | | | MBA | 125000/- |
| 107 | EN1120 | Jawaharlal Darda Institute of Engineering and Technology, Yavatmal | ENGG | 91000/- |
| 108 | EN5173 | SNJB's College of Engineering (Jain Gurukul), Neminagar, Chandwad (Nashik) | ENGG | 113000/- |
| | | | MBA | 82300/- (As demanded) |
| 109 | EN3185 | Vivekanand Education Society's Institute of Technology | ENGG | 151000/- |
| | | | ME | 60000/- |
| | | | MCA | 114000/- |

शु.नि.प्रा.
१६.०५.२०२५

| Sr. No. | Institute Code | Institute Name | Course | Fees approved for the A.Y. 2025-2026 per student as per u/s. 2(g) of the Maharashtra Unaided Private Educational Institutions (Regulation of Admissions and Fees) Act, 2025 |
|---|---|---|---|---|
| 110 | EN1182 | Padmashri Dr.V.B.Kolte College of Engineering, Malkapur | **ENGG** | **81000/-** |
| | | | **ME** | **85000/-** |
| 111 | EN5182 | Kalyani Charitable Trust, Late Gambhirrao Natuba Sapkal College of Engineering, Anjaneri, Nasik | **ENGG** | **86500/-** |
| | | | **ME** | **102000/-** |
| 112 | EN2114 | Deogiri Institute of Engineering and Management Studies, Aurangabad | **ENGG** | **101000/-** |
| | | | **ME** | **62500/-** |
| | | | **MBA** | **77500/-** |
| 113 | EN6782 | Sahakar Maharshi Shankarrao Mohite-Patil Institute of Technology and Research, Shankarnagar, Akluj | **ENGG** | **65000/-** |
| 114 | EN3175 | M.G.M's College of Engineering and Technology, Kamothe, Navi Mumbai | **ENGG** | **92000/-** |
| | | | **ME** | **69000/-** |
| 115 | EN6267 | Kolhapur Institute of Technology College of Engineering, Kolhapur | **ENGG** | **97000/-** |
| | | | **ME** | **65000/-** (As demanded) |
| 116 | EN1114 | Sipna Shikshan Prasarak Mandal College of Engineering and Technology, Amravati | **ENGG** | **107000/-** |
| | | | **ME** | **68000/-** |
| | | | **MBA** | **90000/-** |
| 117 | EN6283 | Annasaheb Dange College of Engineering and Technology, Ashta, Sangli | **ENGG** | **118500/-** |
| 118 | EN6632 | Navsahyadri Education Society's Group of Institutions, Naigaon, Tal : Bhor, Dist : Pune | **ENGG** | **90500/-** |

| Sr. No. | Institute Code | Institute Name | Course | Fees approved for the A.Y. 2025-2026 per student as per u/s. 2(g) of the Maharashtra Unaided Private Educational Institutions (Regulation of Admissions and Fees) Act, 2025 |
|---|---|---|---|---|
| 119 | EN5418 | Guru Gobind Singh College of Engineering & Research Centre, Nashik | **ENGG** | **94000/-** |
| 120 | EN6307 | Dhole Patil Education Society, Dhole Patil College of Engineering, 1284, Ubale Nagar, Wagholi, Taluka – Haveli, Pune – 412 207 | **ENGG** | **117000/-** |
| 120 | EN6307 | Dhole Patil Education Society, Dhole Patil College of Engineering, 1284, Ubale Nagar, Wagholi, Taluka – Haveli, Pune – 412 207 | **MBA** | **57000/-** |
| 121 | EN4134 | Guru Nanak Institute of Engineering & Technology, Kalmeshwar, Nagpur | **ENGG** | **60000/-** |
| 121 | EN4134 | Guru Nanak Institute of Engineering & Technology, Kalmeshwar, Nagpur | **ME** | **NUR** |
| 121 | EN4134 | Guru Nanak Institute of Engineering & Technology, Kalmeshwar, Nagpur | **MBA** | **65500/-** |
| 122 | EN4196 | Gurunanak Educational Society's Gurunanak Institute of Engineering and Management, Nagpur | **ENGG** | **51500/-** |
| 122 | EN4196 | Gurunanak Educational Society's Gurunanak Institute of Engineering and Management, Nagpur | **ME** | **NUR** |
| 123 | EN5409 | Rajiv Gandhi College of Engineering | **ENGG** | **83500/-** |
| 124 | EN5365 | Vardhman Education & Welfare Society's Ahinsa Institute of Technology | **ENGG** | |
| 124 | EN5365 | Vardhman Education & Welfare Society's Ahinsa Institute of Technology | **2023-24** | **85,000/- Adhoc Confirmed** |
| 124 | EN5365 | Vardhman Education & Welfare Society's Ahinsa Institute of Technology | **2024-25** | **85,000/- Confirmed** |
| 124 | EN5365 | Vardhman Education & Welfare Society's Ahinsa Institute of Technology | **2025-26** | **100000/-** |

सूचना:

१. महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश आणि शुल्क विनियमन) अधिनियम, २०१५,

अ) कलम २ या पोटकलम (छ) अन्वये "शुल्क" याचा अर्थ, शुल्क म्हणून निश्चित करण्यात आलेली रक्कम असा आहे आणि त्यामध्ये, शिकवणी शुल्क, ग्रंथालय शुल्क, जिमखाना शुल्क, परीक्षा शुल्क, विकास शुल्क अथवा कोणत्याही अभ्यासानुवर्ती किंवा सह-अभ्यासानुवर्ती कार्यक्रमांकरिता देय असलेली रक्कम, प्रयोगशाळा शुल्क, माहिती पुस्तिका शुल्क आणि विद्यार्थ्यांकडून गोळा केलेली, अन्य कोणतीही रक्कम म्हणजेच एखाद्या खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थेत एखाद्या व्यावसायिक पाठयक्रमाला प्रवेश दिलेल्या कोणत्याही उमेदवाराकडून, कोणत्याही प्रयोजनासाठी अशा संस्थेला देय असलेली रक्कम - मग ती कोणत्याही नावाने संबोधली जाणारी आणि कोणत्याही रीतीने स्वीकारलेली असो - यांचा समावेश होतो, **परंतु त्यामध्ये कोणत्याही वैकल्पिक वसतिगृह-निवासव्यवस्था, भोजनालय आकार आणि विद्यार्थी विमा शुल्क यांचा समावेश होणार नाही.**

आ) कलम २ या पोटकलम (ध) अन्वये "नफेखोरी" याचा अर्थ या अधिनियमाच्या तरतुदीनुसार मान्य केलेल्या शुल्कापेक्षा अधिक असेल अशी, प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे रोख वा वस्तुच्या स्वरुपात स्विकारलेली कोणतीही रक्कम, असा आहे.

इ) कलम १४ या पोटकलम (४) अन्वये प्रत्येक विनाअनुदानित संस्था, नियामक प्राधिकरणाने मान्यता दिलेले पाठयक्रमनिहाय शुल्क आपल्या सूचना फलकावर आणि आपल्या संकेतस्थळावर मराठी व इंग्रजीमध्ये प्रदर्शित करील. परंतु, भाषिक अल्पसंख्यांक संस्थांच्या बाबतीत, अशी संस्था ज्या अल्पसंख्याक भाषेशी संबंधित असेल त्या अल्पसंख्याक भाषेतही ते शुल्क प्रदर्शित करील आणि ते विद्यार्थी व संस्था यांच्यावर बंधनकारक असेल.

कलम १४ या पोटकलम (५) अन्वये कोणतीही संस्था, एखाद्या विद्यार्थ्याकडून एका शैक्षणिक वर्षात एका वर्षाच्या शुल्कापेक्षा अधिक शुल्क वसूल करणार नाही आणि एखाद्या शैक्षणिक वर्षात एका वर्षापेक्षा अधिक वसूल केलेले शुल्क हे कॅपिटेशन फी असल्याचा अर्थ लावण्यात येईल आणि अशी संस्था तिच्याविरुध्द कार्यवाही केली जाण्यास पात्र असेल.

कलम १४ या पोटकलम (६) अन्वये शुल्क नियामक प्राधिकरणाने मान्य केलेले व कळविलेले शुल्क, त्या शैक्षणिक वर्षात त्या विनाअनुदानित संस्थेत प्रवेश घेणा-या उमेदवाराच्या बाबतीत लागू असेल आणि त्यात, संबंधित संस्थेतील अशा विद्यार्थ्याचा पाठयक्रम पूर्ण होईपर्यंत सुधारणा करण्यात येणार नाही.

ई) कलम २० या पोटकलम (१) (क) (ख) (२)(३)(४) अन्वये (५) वारंवार उल्लंघन किंवा अनियमितता झाल्यास, संबंधित प्राधिकरणाकडे, अशा संस्थेच्या नावाची संलग्नता किंवा मान्यता काढून घेण्यासाठी शिफारस करण्यात येईल.

कलम २० या पोटकलम (६) अन्वये जेव्हा या अधिनियमाखालील किंवा त्याखाली केलेल्या नियमांखालील अपराध किंवा अनियमितता व्यवस्थापनाने केली असेल त्याबाबतीत, असा अपराध किंवा अनियमितता घडली त्यावेळी जिच्याकडे, व्यवस्थापनाचे कामकाज चालविण्यासाठी त्याचप्रमाणे व्यवस्थापनासाठी व्यवस्थापनाचा प्रभार होता आणि जी व्यवस्थापनाचे कामकाज चालविण्यास व्यवस्थापनास जबाबदार होती आणि त्या प्रयोजनासाठी व्यवस्थापनाने त्यांच्यामधून नामनिर्दिष्ट केलेली अशी प्रत्येक व्यक्ती, तसेच ते व्यवस्थापनदेखील अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्याच्याविरुध्द कारवाई करण्यात येईल व त्यानुसार त्याला शिक्षा करण्यात येईल.

परंतु, अपराध तिच्या नकळत घडला होता आणि असा अपराध घडू नये म्हणून तिने योग्य ती तत्परता दाखविली होती असे सिध्द केल्यास, अशी कोणतीही व्यक्ती, या पोट-कलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे शिक्षेस पात्र ठरणार नाही.

उ) शुल्क नियामक प्राधिकरणाने मंजूर केलेल्या शुल्कापेक्षा जास्त शुल्क आकारल्यास विद्यार्थी आणि त्यांचे पालक शुल्क नियामक प्राधिकरणाकडे संस्थेच्या विरोधात तक्रार करु शकतात. शुल्क नियामक प्राधिकरणाच्या तक्रार पोर्टलव्दारे असे तक्रार अर्ज ऑनलाइन दाखल केले जाऊ शकतात. शुल्क नियामक प्राधिकरणाकडे सहाय्यक कागदपत्रांसह लेखी तक्रार देखील केली जाऊ शकते.

ऊ) ज्या विनाअनुदानित संस्थांना शुल्क नियामक प्राधिकरणाने मंजूर केलेले हे शुल्क मान्य नसेल, तर ज्यांचे शुल्क प्राधिकरणाने निश्चित केले आहे अशा संस्था, प्राधिकरणाने मंजूर केलेले शुल्क कळविल्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत तपशीलवार कारणांसह प्राधिकरणाकडे पुनर्विलोकन अर्ज दाखल करु शकतात.

ए) संस्थेस पुनर्विलोकन अर्ज सादर करण्याआधी रु ५०,०००/- प्रति अभ्यासक्रम प्रक्रिया शुल्क भरणे आवश्यक आहे. अन्यथा सदर अर्ज नाकारण्यात येईल.

शु.नि.प्रा.
१६.०५.२०२५

सदरील इतिवृत्त संबंधित संस्थांनी त्यांचे कार्यालयाचे संकेतस्थळावर तसेच सूचनाफलकावर प्रसिध्द करुन अनुपालन सादर करावे.उपरोक्त नमुद शुल्काबाबतची सविस्तर पावती (**Headwise Receipt**) संबंधितांना देण्यात यावी.

16/5/25

दिनांक : १६ मे, २०२५
ठिकाण : मुंबई

दिलीप सरदेसाई,भा.प्र.से.
आयुक्त आणि सक्षम अधिकारी,
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा
कक्ष अतिरिक्त कार्यभार म्हणून
सदस्य सचिव,
शुल्क नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य